Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# मौलाना अबुल कलाम आझादांचे राजकीय, समाजवाद आणि धर्मविषयक विचार

**डॉ.बाबासाहेब पाबळे**
राज्यशास्त्र विभागप्रमुख,
मत्स्योदरी कला,वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, अंकुशनगर

## प्रस्तावना :–

भारतीय मुस्लिम राष्ट्रवादी, हिंदु मुस्लिम ऐक्याचे प्रतिक, प्रख्यात धर्मपंडित, अखंड भारताचे समर्थक आणि फाळणीचे तसेच व्दिराष्ट्रवादी सिंध्दांताचे टीकाकार मौलाना अबुल कलाम आझाद यांचा जन्म एका मौलवीच्या, विव्दानाच्या आणि श्रेष्ट वंशाच्या घराण्यात झाला. भारताच्या राष्ट्रीय आंदोलनात, कॉंग्रेसच्या चळवळीत मौलांना अबुल कलाम आझाद यांचे स्थान महत्वाचे आहे. मौलाना अबुल कलाम आझाद ब्रिटीश साम्राज्यसत्तेचे कडवे विरोधक होते. परंतु इतर जहाल उदारमवादाचे आणि धर्मनिरपेक्षतेचे ते पुरस्कर्ते होते. डॉ. ताराचंद म्हणतात, मौलाना कलाम आझांदामध्ये जुन्या काळातील विद्याव्यसंगी वृत्ती, मुत्सदीपणा आणि आधुनिक काळातील स्वातंत्र्यवादी आणि पुरोगामी विचारांचा दुर्मीळ संयोग दिसुन येतो.

आझादांचे आधुनिक भारतीय विचारातील स्थान विचारात घेतांना दोन स्तरावर दृष्टिक्षेप टाकावा लागतो एक म्हणजे भारतातील मुस्लिम राजकीय विचारात आझादांच्या विचाराचे महत्व जाणुण घेणे दुसरा म्हणजे आझादांनी मांडलेला हिंदु मुस्लिम एकतेचा विचार भारतीय राष्ट्रवादाला बळकटी देणारा सिद्ध झाला. ब्रिंटीशांच्या विभाजनाच्या प्रवृत्ती रोखण्याच्या त्यांच्या प्रयत्नाला अंतिम यश जरी आले नाही तर भारतीय राष्ट्रवादाची हिंदु मुस्लिम ऐक्य ही पुर्वअट आहे हे आजही अधोरेखित करणारे आहे म्हणुण आझाद हे आधुनिक भारतातही इस्लाम धार्माचे विव्दान होते.

## संशोधनाचा उद्देश :–

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंघाने मौलाना अबुल कलाम आझाद यांचे राजकीय, समादवाद आणि धर्मविषयक या विषयाचा अभ्यास करणे हा संशोधनाच प्रमुख उद्देश आहे.

संशोधनाची पध्दती :–

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केला असुन त्या संबधी आवश्यक असणारी माहिती संदर्भ ग्रंथ, इत्यादी माहितीच्या संकलनावरून विश्लेषण केले आहे.

"अबुल कलाम आझादांचे राजकीय, समाजवाद आणि धर्मविषयक विचार"

मौलाना आझादाचे राजकीय विचार :–

आझाद हे भारतीय राष्ट्रवादाचे उदगाते होते तसेच धर्मनिरपेक्ष तत्वांचा स्विकार करूनच राजकारण करणे समाजाच्या व राष्ट्राच्या हिताचे असते. मौलाना आझाद धार्मीक असले तरी कर्मकांडानां त्यांनी महत्व दिलेले नाही. बुदि्धप्रामाण्यावाद आणि स्वतंत्र निर्णयबुदधी त्यांच्यात होती सर सय्यद यांच्याही विचारांचा प्रभाव त्यांवर होता. आधुनिक विज्ञान, तत्वज्ञान आणि साहित्य यांचा अभ्यास न करणारा माणुस हा सुशिक्षित नव्हेच असे त्यांचे मत होते. इंग्रजी विद्येने पारंपारिक धर्मश्रद्धा ढवळुन निघाल्या याचे त्यांना समाधान वाटत होते मात्र नंतर त्यांच्या विचारात फरक पडला कारण मोठया प्रमाणात पश्चिमात्यांचे विचारांचे वर्चस्व वाढत चालल्याचे त्यांच्या लक्षात आले. सर सय्यद यांच्या विचारापासुनही मौलाना अबुल कलाम आझाद दुर गेले आझाद अलिगड चळवळीचे पाश्चात विद्याविभुषित पुढारी पश्चिामात्य संस्कृतीचे अंधानुकरण करतात हे त्यांच्या लक्षात आले.

सुरवातीला बुद्धीप्रामाण्यावादी भुमिका घेणारे मौलाना अबुल कलाम आझाद एवढे बदलेले की, त्यांनी त्या काळात स्त्रियांच्या समान हक्कांना विरोध केला बुरखा प्रथेचे समर्थन केले. त्या काळात संपुर्ण भारतीय राजकारणाचा विचार ते धार्मीक पारिभाषेत करीत होते. परंतु त्यांची भुमिका बदलली धर्मकेंदी राजकारणाची निरर्थकता आणि पॅन इस्लामवादाची भ्रममुलकता त्यांच्या लक्षात आली. खिलाफतांची अखेर ही घटना त्यांच्यावर परिणाम करणारी ठरली. धर्मनिरपेक्ष दृष्टिकोनातुन मौलाना अबुल कलाम आझाद राजकारणाचे विश्लेषण करू लागले. इतिहासच्या आणि अर्थशास्त्राच्या सिंध्दातांशी विसंगत असा कोणताही संदेश धर्माच्या नावाखाली देणे त्यांना मान्य नव्हता.

डॉ झाकीर हुसेन यांच्या मते, 'मौलाना अबुल कलाम आझाद यांची सर्वात मोठी राष्ट्रसेवा ही आहे की, त्यांनी लोकांना धर्माच्या दोन बाजुतील फरक करायला शिकवले

त्यापैकी एक बाजु माणसांना एकामेकापासुन तोडते, ही धर्माची खोटी बाजु असते, धर्माची खरी बाजु ही माणसांना एकत्र आणते त्यांचा समजुतदार पणा वाढविते.

मौलाना अबुल कलाम आझादाचे समाजवाद विषयक विचार :–

मौलाना अबुल कलाम आझादांनी समाजवादाविषयी आपली मते व्यक्त केलेली आहेत. त्यांच्या समाजवादी विचारांचे स्वरूप भांडवलशाही आणि उदारमतवाद यांच्या समर्थनचेच होत. कामगारांची आंदोलने मागण्या याबद्दल त्यांना फार सहानभुति होती असे आढळत नाही. त्यांच्या मते लोकशाही आणि समाजवाद यात अंतर्विरोध नाही. विशेष म्हणजे इस्लाम आणि समाजवाद यातील साम्य दाखविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. मौलाना अबुल कलाम आझादांच्या मते इस्लाम आणि समाजवाद या दोधांनाही मालमत्तेचे आणि उत्पादन साधनांचे केंद्रीकरण अमान्य आहे. आधुनिक समाजाला समाजवादाखेरीज प्रगतीचा दुसरा मार्ग उपल्बध नाही. आझादांनी राजकारण साहित्य या दोन्ही क्षेत्रातील पुरोगामी चळवळीला पाठींबा दिला. मौलाना आझाद असे स्पष्ट करतात की एकुण राष्ट्रीय उत्पन्नाचा काही भाग समाजातील गरीब लोंकाच्या कल्याणासाठी कायद्यानेच काढुन ठेवावा. मात्र स्वातंत्र्य विसंगत समाजवाद त्यांना मान्य नव्हता. याचा अर्थ त्यांना उग्र समाजवाद मान्य नव्हता. मौलाना अबुल कलाम आझादांच्या विचार विश्वात एक प्रकारचा समन्वयवाद दिसुन येतो. महात्मा गांधीजीच्या सहवासात आल्यानंतर त्यांच्या विचारावर कॉग्रेसच्या तत्वज्ञानांचा प्रभाव दिसुन येतो.

मौलाना अबुल कलाम आझादाचे धर्मविषयक विचार :–

मौलाना अबुल कलाम आझाद धार्मीक होते. धर्म नाकारणे त्यांना मान्य नव्हते तरी देखील धर्माचे राजकारण करणेही त्यांना मान्य नव्हते. कॉग्रेसमधील धर्मवादी जहाल आणि ब्रिटीशप्रेमी बुद्धीवादी मवाळ या दोघांपेक्षाही मौलाना अबुल कलाम आझादांची धर्मविषयक भुमिका वेगळी होती. लोकांच्या धर्मश्रद्धाना आवाहन करून त्यांना राजकारणात कियाशील करणे त्यांना मान्य नव्हते. धर्म आणि राजकारण यांच्या परस्पर संबंधाविषयी मौलांना अबुल कलाम आझादांचे विचार भारतीय जनतेला मार्गदर्शक ठरतात. ते म्हणतात धर्म हा केवळ उलेमांचा प्रांत मानला तर अनर्थ होईल, कारण उलेमांना फक्त बाहय कर्मकांडेच कळतात. त्यांना फक्त स्वतःचे स्तोम वाढवायचे असते तरी उलेमांवर जाहीर टीका करू नये. मौलाना अबुल कलाम आझादांनी धर्माच्या आध्यात्मिक बाजुपेक्षा नैतिक आचरणांची शिकवण देणा–या बाजुवर अधिक भर दिला. धर्माच्या आचरणातुन माणसांच्या अंगी सद्गुणाची वाढ व्हावी असा त्यांचा हेतु होता.

कर्तव्य निष्टा, चारित्र्य, यांचे संस्कार धर्माच्या माध्यामातुन व्हावेत असे त्यांना वाटत होते. चांगले जीवन जगण्यासाठी आणि सदाचरणासाठी एक प्रेरकशक्ती म्हणजे धर्म असा धर्माचा अर्थ मौलाना आझादांनी सांगितला.

आझाद हे वृत्तीने धार्मीक होते, श्रद्धा आणि धर्म यांचा इतका निकट संबंध असतो की, त्यांच्या मते श्रद्धा म्हणजे धर्म, धर्मावरील विश्वास ठेवणारे व न ठेवणारे ही मानवी समाजातील विभागणी त्यांना मान्य होती. ''अल हिलाल'' वृत्तपत्रात प्रांरभापासुन आझाद धार्मीक विचार प्रसिद्ध करीत असत. मानवी कृतीची इस्लाम प्रेरणा असते असे ते मानत असत. कालांतराने त्यांच्या धार्मीक विचारात परिवर्तन होत गेल त्यांच्या धार्मीक विचारावर वडीलांचा प्रभाव होता. जीवन सरळ व चांगल्या रितीने जगण्यासाठी आध्यात्मिक शिस्त, प्रामाणिकपणा खरे बोलणे या गोष्टी गरजेच्या आहेत असे त्यांचे मत होते.

## निष्कर्ष :–

मौलाना अबुल कलाम आझादांच्या राजकीय, समाजवाद, आणि धर्मविषयक विचारांचा अभ्यास केल्यानंतर काही निष्कर्ष पुढीलप्रमाणे सांगता येतात.

1. भारतीय राजकीय व्यवस्थेतत स्त्रिंयाच्या समान हक्कांना विरोध केला तसेच पुढील काळात धार्मीक परिभाषेचा राजकारणात स्विकार केला.
2. आझादांच्या जीवनात धार्मीक विचांराना महत्व होते इस्लाम धर्माचा विकास कसा झाला हे त्यांच्या अभ्यासावरून कळते.
3. आझादांच्या इस्लामविषयक दृष्टिकोनात सातत्य आणि बदल हे दोन्ही घटक जाणवतात.
4. इस्लामचा स्वांत्रत लढयातील सहभाग, भारतीय राष्ट्रवादातील वाटा ते अधोरेखीत करतात.
5. भारतीय राजकारणांचा विचार ते धार्मीकतेच्या विचारातुन करीत होते.
6. मानवाचे कल्याण हे धर्माचे उदिष्ट असते पण देश काळापरत्वे मानवी समुहाची परिस्थिती भिन्न भिन्न असते.
7. सर्व धर्म मानवी बंधु भावाची शिकवण देतात.
8. धर्मनिरपेक्ष राज्य किवा भौतिक राज्यांची संकल्पना त्यासाठी पाश्चात्य विचार घेऊन राजकीय जीवनाचा विचार याला ते आरंभीच्या काळात नकार दर्शवतात. व धर्मनिरपेक्ष विचारांचा ते स्विकार करतात.

## समारोप :–

आझादांचे आधुनिक भारतीय विचारातील स्थान विचारात घेताना दोन स्तरावर दृष्टिक्षेप टाकावा लागातो एक म्हणजे भारतातील मुस्लिम राजकीय विचारात

आझादांच्या विचाराचे महत्व जाणुण घेणे. आझादानी विसाव्याशतकातील दुस–या दशकात प्रचलित असलेल्या आलिगड मुस्लिम संपद्रायाला टक्कर दिली. आझादानी मांडलेला हिंदु–मुस्लिम एकतेचा विचार भारतीय राष्ट्रवादाला बळकटी देणारा सिद्ध झाला. म्हणुण आझाद हे आधुनिक भारतील इस्लाम धर्माचे विव्दान होते. ते आजही भारतीयांना विशेषता मुस्लिम समाजास मार्गदर्शक ठरणारे आहेत. स्वातंत्र्य चळवळीतील त्यांचे योगदान कोणलाही विसरता येणार नाही यातच त्यांचे मोठेपण सिद्ध होते

संदर्भसुचि :–

1. कसबे रावसाहेब, हिंदु मुस्लिम प्रश्न आणि सावरकरांचा हिंदु राष्ट्रवाद, सुगावा प्रकाशन, पुणे 1994
2. भोले भा.ल. आधुनिक भारतीय राजकीय विचार, पिंपळापुरे प्रकाशन नागपुर.2003
3. भांडारकर शांता, मौलाना आझाद, स्वातंत्र्याच्या जन्मावेळी , ओरीयंट लॉगमन,मुंबई 1961
4. बोराळकर कृ.दी. भारतीय राजकीय विचारवंत, विद्या प्रकाशन नागपुर 1981
5. पाटील व भा. प्राचीन व आधुनिक राझकीय विचारवंत, प्रशांत प्रकाशन, जळगाव 2009
6. लोटे रा. ज. भारतीय राष्ट्रवाद चळवळी आणि संवैधानिक विकास, पिंपळापुर प्रकाशन, नागपुर 1999